१५

<u>महत्वाचे- कालमर्यादित</u>

क्र.सिंजिप/ग्रापापु/आस्था-२/बदल्या/ ५९ /17.
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
सिंधुदुर्गनगरी,दि. १५ /04/2017.

प्रति,

१)गट विकास अधिकारी पंचायत समिती(सर्व)
२)उप अभियंता(ग्रापापु) जिल्हा परिषद उपविभाग (सर्व)

**विषयः- ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत कनि./शाखा अभि.(ग्रापापु) यांच्या सन 2017 च्या प्रशासकीय बदल्यांची वास्तव्य सेवाजेष्ठता सूची प्रसिध्दीबाबत.**

**संदर्भः-** शासन ग्राम विकास विभागाकडील निर्णय क्र.जिपब-४१४/प्र.क्र.११२/ आस्था-१४, दि.१५ मे २०१४.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाअंतर्गत सन 2017 मधील बदल्यांसाठी कनि./शाखा अभियंता यांची माहिती उपअभियंता(ग्रापापु) जि.प. उपविभाग यांचेकडून मागविणेत आलेली होती. त्याच्या आधारे कनि./शाखा अभियंता(ग्रापापु) यांच्या प्रशासकीय बदल्यांची वास्तव्य सेवाजेष्ठता सुची तयार करणेत आलेली आहे.

सदरची वास्तव्य सेवाजेष्ठता सुची दि.17/04/2017 रोजी सर्व ग्रामीण पाणी पुरवठा उप विभागामध्ये व पंचायत समीत्यांमध्ये प्रसिध्द करणेत यावी. सदर सुची प्रसिध्दीची माहिती आपल्या कार्यालयातील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे अधिनस्त कनि./शाखा अभि.(ग्रापापु) यांचे निदर्शनास आणावी. सदर सुची बाबत कोणाही कनि./शाखा अभि. यांची हरकत/सूचना/आक्षेप असल्यास त्या पंचायत समित्यांमधील स्वतंत्र नोंदवहीमध्ये किंवा लेखी स्वरूपात दि.१८ एप्रिल ते २७ एप्रिल पर्यंत नोंदवून घेणेच्या आहेत. सदरच्या हरकत/सूचना/आक्षेप दि.28/04/2017 रोजी संबधित लिपीकामार्फत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प.सिंधुदुर्ग येथे समक्ष सादर करणेच्या आहेत.

तसेच सदरची अंतरीम वास्तव्य सेवाजेष्ठता सुची जिल्हा परिषद मुख्यालयांत सूचनाफलकावर प्रसिध्द करणेत येत आहे.सदर सूचीवर ग्रापापु विभागाकडील कनि./शाखा अभियंता यांना हरकत/सूचना/आक्षेप नोंदविणेचे असल्यास ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प.सिंधुदुर्ग येथे स्वतंत्र नोंदवही ठेवणेत आलेली असून दि.१८ एप्रिल ते दि.२७ एप्रिल पर्यंत आक्षेप/सुचना नोंदवून घेणेत येणार आहेत.

मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती/सूचना/आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घेणेत यावी. सदर हरकती/सूचना/आक्षेपांचे निराकरण करुन **अंतिम सेवाजेष्ठता सुची दि.०३ मे रोजी** प्रसिध्द करणेत येणार असून ती सर्व पंचायत समित्या,उपविभाग(ग्रापापु)जि.प.मुख्यालयात सूचनाफलकावर प्रसिध्द करणेत येणार आहे.

**तसेच संदर्भिय शासन निर्णयातील प्रकरण-१ परिच्छेद क्र.३ (ब) (क) मधील अपंग कर्मचारी व मतिमंद मुलांचे पालक,विधवा,परितक्त्या/घटस्फोटीत महिला कर्मचारी/कर्करोगाने(कॅन्सर) आजारी/पक्षघाताने आजारी/ डायलेसिस सुरू असलेले कर्मचारी यांनी योग्य तो पुरावा दि. 30 एप्रिल 2017 पर्यंत सादर केल्यास त्यांना प्रशासकीय बदलीतून वगळणेत येईल. तसेच समुपदेशनाच्या वेळी प्रशासकीय बदलीपात्र कर्मचाऱ्यांचा प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे ठरविणेत आलेला असून पक्षाघाताने आजारी/हृदयशस्त्रक्रिया झालेले/जन्मापासून 1 किडणी, किडणी रोपण केलेले, डायलिसीस सुरू असलेले/ कर्करागाने (कॅन्सर) आजारी/ अजी-माजी सैनिक व अर्धसैनिक जवानांच्या पत्नी / कुमारीका कर्मचारी यांनी योग्य तो पुरावा दि. 30 एप्रिल 2017 पर्यंत सादर केल्यास त्यांना प्रशासकीय बदलीसाठी प्राधान्यक्रम देणेत येईल.**

**तसेच पती पत्नी एकत्रिकरण सवलतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करणेचा असून पती किंवा पत्नी सेवेत असलेबाबतचा दाखला दि. 30 एप्रिल 2017 पर्यंत सादर केल्यास त्यांना पती-पत्नी एकत्रिकरण सवलतीचा लाभ देणेत येईल.**

वरिल सूचना संबधितांच्या निदर्शनास आणून देण्यांत याव्यात व दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेत यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

**सोबत**-प्रशासकीय बदल्यांची अंतरीम वास्तव्य जेष्ठता सुची
(संवर्ग-कनि./शाखा अभियंता (ग्रापापु))

प्रत-जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्दिस.
प्रत-जिल्हा समन्वय महाऑनलाईन, [illegible]

[illegible]

जिल्हा परिषद सिंधुदुर्ग गट-क(वर्ग-३) च्या कर्मचा-यांच्या एका पंचायत समिती क्षेत्रामधील अन्य पंचायत समिती क्षेत्रामध्ये जिल्हांतर्गत प्रशासकीय बदल्यांची वास्तव्य सेवा जेष्ठता सूची सन-२०१७ संवर्ग -शाखा/कनिष्ठ अभियंता (ग्रापापु)

| अ. क्र. | नाव | सध्याचे कार्यालय | सध्याचे कार्यालयात येण्यापूर्वीचे कार्यालय | जन्मतारीख | दिनांक 31/05/2016 रोजीचे वय | नियुक्ती दिनांक | मूळ राहण्याचे ठिकाण | सध्याच्या कार्यालयामध्ये केव्हापासून | सध्याच्या मुख्यालयी केव्हापासून | सध्याच्या तालुक्यामध्ये केव्हापासून | दि.31-05-2016 रोजी तालुक्यामध्ये झालेली सेवा | पती/पत्नी सेवेत असल्यास कार्यालय | प्रशासकीय बदली सूट- अपंग कर्मचारी व मतिमंद मुलाचे पालक/ विधवा/परित्यक्ता/ घटस्फोटीत महिला कर्मचारी/ कर्करोगाने(कॅन्सर) आजारी/ पक्षाघाताने आजारी/ डायलेसिस सुरु असलेले कर्मचारी/ वय ५३ वर्षे पेक्षा जास्त | समुपदेशनाच्या वेळी प्रशासकीय बदलीपात्र कर्मचाऱ्यांना प्राधान्यक्रम पक्षाघाताने आजारी/हृदयशस्त्रक्रिया झालेले/जन्मापासून 1 किडणी, किडणी रोपण केलेले, डायलिसीस सुरु असलेले/ कर्करोगाने (कॅन्सर) आजारी/ आजी-माजी सैनिक व अर्धसैनिक जवानांच्या पत्नी / कुमारीका कर्मचारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १३ | १५ | १६ |

-- निरंक --

कार्यकारी अभियंता (ग्रापापु)
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग